# <u>प्रेसनोट</u>

दि. ०५/१०/२०२३

**पंचायत समिती, वडगाव मावळ, जि. पुणे येथील विस्तार अधिकारी यांचेवर लाच स्विकारले प्रकरणी कारवाई.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | वडगांव मावळ पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७. |
| तक्रारदार | पुरुष, वय - २० वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | अंकुश किसन खांडेकर, वय ५७ वर्ष, पद – विस्तार अधिकारी (वर्ग-३) पंचायत समिती वडगाव मावळ, जि. पुणे |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ४०,०००/- रुपये (चाळीस हजार रुपये) |
| स्वीकारलेली लाच रक्कम | ४०,०००/- रुपये (चाळीस हजार रुपये) |
| पडताळणी दिनांक | १५/०९/२०२३, १६/०९/२०२३ व दि. १८/०९/२०२३ |
| सापळा दिनांक | ०५/१०/२०२३ |

ठिकाण :- पंचायत समिती वडगाव मावळ, पुणे येथील कार्यालयामध्ये.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार हे जागृती एंटरप्रायजेसमध्ये साईट मॅनेजर म्हणून काम पाहत असून, जागृती एंटरप्रायजेसचे अंतर्गत बारा व्हॅट सोलर स्ट्रीट लाईट वर्क ऑर्डरचे काम लोहगड येथे चालू करायचे आहे. त्यासंदर्भाने ग्रामपंचायत लोहगड अंतर्गत शुल्क अनुदानातून रक्कम रु. १,४४,३२०/- व १८% जीएसटी अशी निविदा जागृती एंटरप्रायजेसच्या नावाने मंजूर झालेली असून, त्या कामाचा कार्यारंभ आदेश देण्यासाठी लोकसेवक अंकुश खांडेकर यांनी ४०,०००/- रुपयांची लाच मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

तक्रारदारांनी दिलेल्या तक्रारीची पडताळणी केली असता, लोकसेवक अंकुश खांडेकर यांनी तक्रारदार यांचेकडे जागृती एंटरप्रायजेसच्या नावाने मंजूर झालेल्या कामाचा कार्यारंभ आदेश देण्यासाठी ४०,०००/- रुपयांची लाचेची मागणी पंचासमक्ष करुन, ४०,०००/- रुपये (चाळीस हजार रुपये) लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारल्यावर त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले असून, वडगाव मावळ पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याचे काम सुरु आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक विद्युलता चव्हाण तपास करीत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-अॅप क्रमांक पुणे – ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-अॅप क्रमांक मुंबई – ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६. वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
७. ऑनलाईन अॅप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

(नितीन विजय जाधव)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.